# के. के. वाघ अभियांत्रिकीत 'नेक्सस २०२५' उत्साहात

**सकाळ वृत्तसेवा**

नाशिक, ता. १८ : के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड डेटा सायन्स विभागाने 'नेक्सस २०२५' या विभागीय संशोधन परिसंवादाचे आयोजन केले होते. यावेळी महाविद्यालयातील अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांनी तीस संशोधन लेखांचे सादरीकरण केले. यात आर्टिफिशियल इंटेलिजन्स, मशीन लर्निंग, सायबर सिक्युरिटी, ब्लॉकचेन टेक्नॉलॉजी, डेटा सायन्स, डीप लर्निंग अशा विविध अत्याधुनिक तंत्रज्ञान क्षेत्रांचा समावेश आहे.



नाशिक : के. के. वाघ अभियांत्रिकीत विभागीय संशोधन परिसंवादात सहभागी प्राचार्य नांदूरकर. शेजारी संशोधन लेखांचे सादरीकरण करणारे विद्यार्थी.

अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांना प्रकल्पावर आधारित संशोधन लेख तयार करण्यास प्रोत्साहित करणे हा उपक्रमाचा उद्देश होता. याशिवाय विद्यार्थ्यांमध्ये संशोधन वृत्ती विकसित करणे, सादरीकरण कौशल्यात वाढ करणे आणि उच्च दर्जाचे शैक्षणिक लेखन करण्यास सक्षम करणे असा असल्याचे प्राचार्य डॉ. केशव नांदुरकर यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर यांनी केले. यावेळी व्यासपीठावर अधिष्ठाता डॉ. सुनील कुटे, विभागप्रमुख डॉ. स्नेहल कमलापूर, डॉ. रवींद्र मुंजे, डॉ. दर्शन मेधणे व विद्यार्थी उपस्थित होते. हा उपक्रम आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड डेटा सायन्स विभागाच्या संशोधनाभिमुख शैक्षणिक ध्येयाकडे एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरला आहे. उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना नावीन्यपूर्ण संशोधनासाठी प्रेरणा मिळाली असून भविष्यातही अशाच स्तरावरील कार्यक्रम आयोजित करण्याचा विभागाचा मानस असल्याचे मत डॉ. दर्शन मेधणे यांनी व्यक्त केले.

परीक्षक म्हणून डॉ. स्वाती भावसार, डॉ. राजीव भांडारी, डॉ. नेहा बोरा व डॉ. ख्याती निर्मळ यांनी परिक्षण केले. कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी व प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. डॉ. स्नेहा खैरे व विभागातील सर्व प्राध्यापक व फिनिक्स स्टुडंट क्लब यांनी कार्यक्रम यशस्वितेसाठी प्रयत्न केले.

**सकाळ 19-11-2025**